**विशेष सहाय्य अनुदान योजनेंतर्गत वैश्विक ओळखपत्र (UDID Card) नसणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग सक्षमीकरण विभाग**
**शासन निर्णय क्र. विसयो- २०२६/ प्र.क्र.३९/कार्यासन-०६**
**ई-ऑफिस क्र. १६६१५२७**
३१, ३२, ३५ ए, मित्तल टॉवर, ए-विंग, तिसरा मजला
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.
दिनांक :- १५ मे, २०२६.

**वाचा**:- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.विसयो-२०१८ /प्र.क्र.६२/ विसयो, दि. २० ऑगस्ट, २०१९,
२) दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२४ /प्र.क्र.८६/दि.क.२, दि.२७ जून, २०२४.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.विसयो-२०२६ /प्र.क्र.०६/ विसयो, दि. २४ फेब्रुवारी, २०२६.
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.विसयो-२०२५ /प्र.क्र.६९/ विसयो, दि. २७ मार्च, २०२५.

**प्रस्तावना :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारीत स्वरुपात १.संजय गांधी निराधार अनुदान योजना, २.श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, ३.इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, ४.इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व ५.इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

सदर योजनामध्ये दिव्यांग लाभार्थ्यांचाही समावेश आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपरोक्त नमूद ५ योजनांमधील डी.बी.टी. पोर्टलवर नोंद असलेले सर्व दिव्यांग लाभार्थी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार या विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २७ मार्च, २०२६ रोजीच्या शासन निर्णय प्रमाणे वैश्विक ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.

विशेष सहाय्य योजनेतील ज्या दिव्यांग लाभार्थ्यांकडे वैश्विक ओळखपत्र (UDID) नाही अशा लाभार्थ्यांना दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे वैश्विक ओळखपत्र (UDID) बंधनकारक केलेल्या परिपत्रकामूळे त्यांना सद्यस्थितीत दिव्यांग प्रवर्गातून योजनेचे लाभ देण्याचे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे, दिव्यांगांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID) नसणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांना UDID Card काढण्यासाठी कालावधी निश्चित करण्याची/देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ज्या दिव्यांग लाभार्थ्यांना दिनांक १ एप्रिल, २०२६ पूर्वी संजय गांधी निराधार अनुदान योजना व इतर विशेष सहाय्य योजनेतून दिव्यांग प्रवर्गातून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुदान देण्यात येत होते, फक्त अशा लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनेचे लाभ चालू ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे:-

१. संबंधित तहसिलदाऱ्यांनी मार्च २०२६ पर्यंत लाभ घेत असलेल्या सर्व दिव्यांगांना ज्यांच्याकडे जुन्या प्रकारचे, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र/SADM प्रमाणपत्र आहे. अशा सर्व दिव्यांगांची प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या यंत्रणामधून समन्वय साधून दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत वैश्विक ओळखपत्र (UDID Card) काढून घेण्यात यावे. सदर कालावधीत त्यांचे लाभ सुरु ठेवण्यात यावेत.

२. उप जिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन विभाग /विशेष सहाय्य योजना) यांनी संबंधित तहसिलदारांचा विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांबाबत नियमित आढावा घेतील. सहाय्यक आयुक्त (दिव्यांग सक्षमीकरण) हे प्रत्येक तालुक्यातील तहसिलदार यांच्याशी समन्वय साधून दिव्यांगांना योजनेचे लाभ मिळवून देतील.

३. नायब तहसिलदार (विशेष सहाय्य योजना) यांनी विशेष सहाय्य योजनेतील वैश्विक ओळखपत्र नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांकडून यांनी १५ जून, २०२६ पर्यंत वैश्विक ओळखपत्र प्राप्त करण्यासाठी स्वावलंबन पोर्टल अन्वये अर्ज सादर करून घ्यावेत.

४. अर्ज सादर केल्यानंतर अर्जाचा क्रमांक (Enrollment number) SAS (Social Assistance Scheme) पोर्टल वर अद्यावत करण्यात यावे.

५. SAS पोर्टल मध्ये अर्जाचा क्रमांक नोंदविण्यासाठी आवश्यक सुधारणा माहिती तंत्रज्ञान महामंडळाने करावी.

६. विशेष सहाय्य योजनेतील काही दिव्यांगांचे वैश्विक ओळखपत्र (UDID Card) व आधार कार्ड यांच्यावरील जन्म तारखेत तफावत आढळून येत आहेत याबाबत तहसिलदार यांनी विशेष मोहिम राबवून सदर तफावत दूर करावी. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक (DPM) यांच्या सहकाऱ्यांने आधार कार्ड आणि स्वावलंबन पोर्टलच्या माध्यमातून वैश्विक ओळखपत्रातील बदल अद्ययावत करावे.

७. तहसिलदार यांच्या SAS पोर्टल वरील DESK-१ लॉगीन मध्ये PASS व FAIL रिपोर्ट उपलब्ध आहे. त्यातील FAIL रिपोर्ट मध्ये नमूद आधार व बँक खाते संलग्नीकरण, KYC, आधार अद्यावतीकरण इत्यादी बाबी सुध्दा तहसिलदार यांनी संबंधित लाभार्थ्यांकडून पूर्ण करुन घ्याव्या. तहसिलदार यांनी DESK-१ मधून अद्ययावत केलेल्या नोंदी जिल्हाधिकारी कार्यालयातील DESK-२ लॉगीन मधून त्यास मान्यता देण्यात यावी.

८. तहसिलदार यांनी विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांचे गाव निहाय यादी प्रसिध्द करावी व गावपातळीवर या यादीचे वाचन करुन हयात नसलेले व बनावट लाभार्थ्यांना योजनेतून वगळण्यात यावे व त्यांच्याकडून घेण्यात आलेल्या रकमेची वसूली करण्यात यावी.

९.     सर्व उपविभागीय अधिकारी यांनी दिव्यांग लाभार्थी साठी विशेष सहाय्य योजनेची शिबीरे व कार्यशाळा प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी आयोजित करावी. त्यासाठी सर्व विभागांना आमंत्रित करण्याची जबाबदारी उपविभागीय अधिकारी यांची राहील. ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी कोणताही लाभार्थी हा (UDID Card) अभावी विशेष सहाय्य योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची उपविभागीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१०.     सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा महसूल अधिकारी परिषदेत विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांचा नियमित आढावा घ्यावा.

११.     सर्व तहसिलदार यांनी वैश्विक ओळखपत्र (UDID Card) नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांची यादी दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्जाच्या प्रतिसह (Enrollment Numebr) वैश्विक ओळखपत्र निर्गमित करण्याऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास उपलब्ध करून द्यावी.

१२.     सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी सहाय्यक आयुक्त (दिव्यांग सक्षमीकरण) व तहसिलदार यांच्या सहाय्याने संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा सामान्य रूग्णालय व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या व इतर दिव्यांगाचे वैश्विक ओळखपत्र (UDID Card) निर्गमित करणाऱ्या यंत्रणाकडून विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेणाऱ्या दिव्यांगांना वैश्विक ओळखपत्र तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहिम राबवावी.

१३.     विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्याने ३० सप्टेंबरपर्यंत वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन देण्याबाबत कार्यवाही करावी.

१४.     सर्व पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी तहसिलदार यांची राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५१५१८३०३९१६३५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR

Digitally signed by SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=DEPwD, 2.5.4.20=1FD0BA050AFD8B541478DADD67654A462394D4B092AA83CF80DC3EB2722EF7F1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B36F2DE828CF58932F62F0A5F9320AC750FBA48646152A059F8C4D72B27812AB, cn=SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
Date: 2026.05.15 18:32:09 +05'30'

**(साईप्रसाद द. मुकदाडवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मंत्री (दिव्यांग सक्षमीकरण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
२) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
४) आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५) संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई,
६) विभागीय आयुक्त (सर्व),
७) जिल्हाधिकारी (सर्व),

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व),
९) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्य सामान्य रूग्णालय, (सर्व),
१०) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सर्व
११) सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, सर्व
१२) जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक (UIDAI), सर्व
१३) जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१४) निवड नस्ती, कार्यासन-०६.